**नियमित दिवाणी दावा नं. ४३१/२०१६**

त्रिवेणी अर्जुनराव जाधव वगैरे वि.

नारायण बाबु बंडगर वगैरे

**निशाणी ३४ वर आदेश नियमित दिवाणी दावा नं. ४३१/२०१६**

(आदेश पारित दिनांक १८/०६/२०२२)

प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरूध्द डिक्लेरेशन व खरेदीखत रद्दबातल ठरवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने सदरील अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ प्रमाणे वादीच्या सरनाम्यात दुरुस्ती करण्याकरिता केलेला आहे. वादीच्या कथनांप्रमाणे वादीने दिनांक १४.०९.१९९२ रोजीचा खरेदीचा दस्त पोकळ व रद्दबातल आहे असे जाहीर होवून मिळणेसाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे. यातील प्रतिवादी क्र. ५ यांनी त्यांचे वादी म्हणून असलेले नाव कमी करणेत यावे यासाठी अर्ज दिला होता. तो अर्ज मंजुर होवून त्याप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करण्यात आली. परंतु वादी क्र. १ हा मयत हरिभाऊ शंकर पडवळे यांचा मुलगा असून वादी क्र. १ ते ४ यांचा सख्खा भाऊ आहे. वादी क्र. ५ हा दाव्यास आवश्यक पक्षकार आहे. आवश्यक त्या पक्षकारा अभावी हा दावा रद्द होवू नये तसेच दाव्याचा निकाल होण्याच्या दृष्टीने वादी क्र. ५ यास दाव्याच्या कामी पक्षकार करणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुत अर्जाद्वारे खालीलप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करून मागितलेली आहे.

०२. दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. १० नंतर प्रतिवादी क्र. ''११'' असा स्वतंत्र आकडा टाकून त्यापुढे खालीलप्रमाणे दुरूस्ती करावी

प्रतिवादी क्र. ११. श्री. विष्णु हरिभाऊ पडवळे,
वय – ६४, धंदा– पेन्टर,

रा. गांधी रोड, सनगर गल्ली, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर.

०३. प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे वादींनी वर नमूद दुरूस्ती करणेची परवानगी मागितलेली आहे.

०४. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी क्र. १ व २ तसेच ९ व १० यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, वादीचा अर्ज खरा व बरोबर नाही. वादींना अर्जात नमूद दुरूस्ती कदापी करता येणार नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात बदल होणार आहे. वादीचा अर्ज मुदतीत नाही. दाव्याच्याकामी वादी क्र. ५ याने निशाणी क्र. ३० च्या अर्जावर दुतर्फा चौकशी होवून आदेश पारित झालेला आहे. वादींनी निशाणी क्र. ३० च्या अर्जावर कोणतीही बाजू मांडली नाही. दावा खरेदीखत रद्दबातल ठरवून मिळणेचा आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ हा आवश्यक पक्षकार नाही. वादीचा अर्ज कायदयाने चालू शकत नाही. दावा दुरूस्तीची आवश्यकता नाही. त्यामुळे वादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

०५. अभिलेख, अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा डिक्लेरेशन व खरेदीखत रद्दबातल ठरवून मिळणेसाठी केलेला आहे. सदरचा दावा हा खरेदीखत रद्दबातल ठरवून तसे जाहीर होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतकामी वादींनी नमूद केलेले विष्णु हरिभाऊ पडवळे हे पूर्वी सदर दाव्यामध्ये वादी म्हणून सामील होते. सदर विष्णु पडवणे यांनी निशाणी क्र. ३० ला अर्ज दाखल करून त्यांना वादी म्हणून कमी करण्यात यावे अशी विनंती केली व त्याप्रमाणे अर्ज मंजुर होवून त्यांचे नाव कमी झालेले आहे. वादींनी प्रस्तुत अर्जाद्वारे सदर विष्णु पडवळे हे आवश्यक पक्षकार आहेत कारण त्यांचा प्रस्तुत दाव्याशी

हितसंबंध जोडलेला आहे. प्रस्तुत दावा आवश्यक त्या पक्षकार अभावी रद्द होवू नये. तसेच, दाव्याचा अंतिम निर्णय गुण–दोषावर होण्यासाठी सदर व्यक्तीस प्रतिवादी म्हणून सामील करणेस विनंती केली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता, सदर विष्णु हरिभाऊ पडवळे हा मयत हरिभाऊ पडवळे यांचा मुलगा असल्याचे दिसून येते. ज्याअर्थी वादी हे मयत हरिभाऊ पडवळे यांच्या वतीने वादी हे त्यांचे वारसदार म्हणून सदरचा दावा चालवत आहेत. त्याअर्थी विष्णु पडवळे हा देखील प्रस्तुत दाव्याचा आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येते. जरी प्रस्तुत विष्णु पडवळे याने स्वतःचे नाव वादी म्हणून कमी केले असेल तरी त्याला प्रतिवादी म्हणून सामील केलेस दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होणार नाही. सदरची व्यक्ती आपले म्हणणे प्रतिवादी म्हणून दाखल करू शकते. त्यामुळे आवश्यक पक्षकाराची बाधा येण्याचे वादीचे कथन संयुक्तिक दिसून येते. त्यामुळे सदर प्रस्तुतची दुरूस्ती न्यायाची व जरूरीचे आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा निकाल गुण दोषावर लागण्याकरिता आवश्यक आहे. सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादींचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही किंवा प्रतिवादींना त्यांचा बचाव देखील सदर दुरूस्तीमुळे बदलावा लागेल असेही कारण दिसून येत नाही. सबब, सदर अर्ज मंजुर करणेस कोणतीही हरकत दिसून येत नाही.

०६. त्यामुळे वादी यांना प्रस्तावित दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येते. वादी यांनी कायदेशीर कालमर्यादेमध्ये प्रस्तावित दुरुस्ती करावी.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्र. ३४ चा अर्ज मंजुर करणेत येतो.

२. वादीस निर्देशित करण्यात येते की, वादीने अर्जाप्रमाणे दाव्यामध्ये दुरूस्ती

करून दाव्याची दुरूस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. प्रस्तुतची दुरूस्ती वादीने या आदेशाच्या १४ दिवसांच्या आतमध्ये करणेची आहे.

४. सदरचा खर्च वादीने सोसणेचा आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर )

RANJANA GOVIND KUMBHAR

Digitally signed by RANJANA GOVIND KUMBHAR
Date: 2022.06.20 15:16:13 +0530

दिनांक– १८/०६/२०२२

ठिकाण– पंढरपूर

श्रीमती आर. जी. कुंभार
४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पंढरपूर

Certificate

I affirm that, the contents of this PDF file Order/Judgment are same word to word, as per original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | M.P.Gheradi ( L. G.) |
| Court | :- | $4^{th}$ Jt.C.J.J.D. & J.M.F.C. Pandharpur |
| Date | :- | 18/06/2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | :- | 18/06/2022 |
| Judgment/Order uploaded on | :- | 20/06/2022 |